गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली अंतर्गत

नूतन शिक्षण प्रसारक मंडळ, देसाईगंज द्वारा संचालित

# आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

## देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली

नॅक द्वारा पुनर्मुल्यांकित बी ++ (CGPA २.९१) दर्जा प्राप्त

द्वारा आयोजित

# राज्य स्तरीय दुहेरी गीत गायन स्पर्धा

## State Level Duet Singing Competition

**दिनांक : २८ मार्च २०२६ रोज शनिवारला, सकाळी १०.०० वा.**

**स्थळ : सांस्कृतिक सभागृह, आदर्श महाविद्यालय, देसाईगंज**

प्रती,

मा. प्राचार्य,

...............................

...............................

सप्रेम नमस्कार,

विद्यार्थ्यांच्या उपजत कलागुणांना प्रोत्साहन देणे म्हणजे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासाला दिशा देणे होय. या कलागुणांना योग्य मंच मिळाला तर ते केवळ छंदापुरते मर्यादित राहत नाहीत, तर अधिक परिष्कृत होऊन व्यावसायिक स्वरूप धारण करतात. उपजत कौशल्ये अधिक विकसित होऊन सर्जनशीलतेला नवे आयाम मिळतात. यामुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक सक्षम व परिपूर्ण होते. आजच्या काळात कला ही केवळ मनोरंजनाचे साधन नाही, तर कारकीर्दचा एक महत्त्वाचा मार्ग आहे. योग्य मार्गदर्शन व संधी मिळाल्यास विद्यार्थी व्यावसायिक यश मिळवू शकतात. NEP 2020 च्या चौकटीत कला व कौशल्याधारित शिक्षणाला विशेष महत्त्व दिले गेले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे हे शैक्षणिक धोरणाशी सुसंगत आहे.

विद्यार्थ्यांच्या उपजत कलागुणांना प्रोत्साहन देऊन त्यांना अभिव्यक्तीचे मंच उपलब्ध करून देणे हे त्यांच्या वैयक्तिक, शैक्षणिक आणि व्यावसायिक आयुष्याला नवी दिशा देणारे ठरते. हाच उद्देश पुढे ठेऊन आमच्या आदर्श महाविद्यालयाने राज्य स्तरीय दुहेरी गीत गायन स्पर्धेचे आयोजन केले आहे.

आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या स्पर्धेकरिता पाठवून सहकार्य करावे, हि विनंती.

**प्रथम पुरस्कार**
**३००१/-**

**द्वितीय पुरस्कार**
**२००१/-**

**तृतीय पुरस्कार**
**१५००/-**

♦ स्पर्धेचे नियम व अटी –

१. स्पर्धेत राज्यातील सर्व विद्यापीठ/महाविद्यालयातील पदवी (UG) व पद्व्यातर (PG) आभासक्रमातील विद्यार्थ्यांना सहभागी होता येईल.
२. हि स्पर्धा दुहेरी गीत गायन असल्यामुळे प्रत्येक महाविद्यालयातून केवळ एकाच जोडीला ( दोन स्पर्धक मुलगा व मुलगी ) सहभागी होता येईल.
३. स्पर्धकांना चालू वर्षाचे ओळखपत्र व प्रचार्याचे मान्यता पत्र सादर करणे अनिवार्य राहील.
४. स्पर्धकांना हिंदी अथवा मराठी भाषेतील गीत सादर करावे लागेल.
५. एका गीताला कमाल ७ मी. कालावधी देण्यात येईल.
६. Karaoke गीताचे रेकार्डिंग नोंदनी करते वेळी आयोजकाकडे सादर करावे.
७. स्पर्धकांनी आपल्या गीतासाठी साज संगत वादक सोबत आणावे. आयोजका कडून वादकाची व्यवस्था करण्यात येणार नाही.
८. परीक्षकांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.
९. विजेत्या स्पर्धकांना रोख बक्षिसा व्यतिरिक्त स्मृती चिन्ह प्रदान करण्यात येईल.
१०. सर्व सहभागी स्पर्धकांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.
११. प्रत्येक स्पर्धक जोडीला १०० रु नोंदणी शुल्क जमा करणे अनिवार्य राहील.
१२. सर्व स्पर्धकांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात येईल.
१३. स्पर्धेनंतर लगेच बक्षीस वितरण होईल.

संपर्कासाठी भ्रमणध्वनी क्रमांक – ८६६९०१७५८४, ९४०३३१५४८७

## आयोजक

आंतर महाविद्यालयीन स्पर्धा विभाग

आणि संस्कृतिक विभाग

**आदर्श कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, देसाईगंज**

**डॉ. निहार बोदेले**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख तथा
समिती प्रमुख, आंतर महाविद्यालयीन स्पर्धा विभाग

**प्रा. डॉ. हितेंद्र धोटे**
सांस्कृतिक विभाग प्रमुख तथा
समन्वयक, IQAC

**प्रा. डॉ. श्रीराम गहाणे**
प्राचार्य
**आदर्श महाविद्यालय, देसाईगंज**